1) म.टा. पु. पान क्र. 1

दि. 21/01/2023

# वाहनचोरीच्या केवळ ४५ टक्के गुन्ह्यांची उकल

**भाविक पाटील,** मिरा-भाईंदर

| पोलिस ठाणे | दाखल गुन्हे | उकल |
|---|---|---|
| वालीव | १२० | ४२ |
| माणिकपूर | ७६ | ४१ |
| पेल्हार | ७० | ३२ |
| विरार | ६८ | १९ |
| नवघर | ६३ | ३२ |
| नयानगर | ६० | ३८ |
| काशिमिरा | ५८ | ४३ |

* जानेवारी ते नोव्हेंबरपर्यंतची आकडेवारी (२०२२)



**मिरा-भाईंदर-वसई-विरारमध्ये वर्षभरात ७७५ घटना**

मटा विशेष

मिरा-भाईंदर व वसई-विरार आयुक्तालयाच्या हद्दीत मागील वर्षभरात दुचाकी-चारचाकी वाहनचोरीच्या ७७५ घटना घडल्या आहेत. या गुन्ह्यांची आकडेवारी अधिक असली तरी त्याच्या तुलनेत केवळ ४५ टक्के एवढ्याच गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिस प्रशासनाला यश आले आहे. यातून पोलिसांच्या हाती चोर लागत नसल्याचे निदर्शनास आले आहे. परिणामी, अनेक वाहनमालक चोरीला गेलेले वाहन पुन्हा कधी मिळते, याच्या प्रतीक्षेत आहेत.

मिरा-भाईंदर आणि वसई-विरार शहरांमधील सार्वजनिक वाहतूकसुविधेचा प्रश्न व त्यामुळे प्रवासासाठी लागणारा अधिकचा वेळ टाळण्याच्या दृष्टीने बहुतांश नागरिक खासगी वाहनांवर अवलंबून आहेत. या दोन्ही शहरांत वाहने उभी करण्यासाठी जागा नसल्याने ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. म्हणून बहुतेक वाहने रस्त्यालगत किंवा खुल्या जागेत उभी करावी लागतात. या वाहनांना चोरांनी लक्ष्य बनवल्याचे पाहायला मिळत आहे. परिणामी वाहनचोरीच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे.

मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत जानेवारी ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत तब्बल ७७५ वाहनचोरीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. यात वसई-विरार शहरातील वालीव, माणिकपूर व पेल्हार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रकरणे सर्वाधिक आहेत. तर, मिरा-भाईंदर शहरामधील काशिमिरा, नवघर व नयानगर या पोलिस ठाण्यांतील गुन्ह्याचा अधिक समावेश आहे. या गुन्ह्यांत दुचाकी, चारचाकी व इतर वाहनांचाही समावेश आहे.

या प्रकरणांचा तपास केल्यानंतर केवळ ३४९ वाहनचोरीच्या गुन्ह्यांची उकल पोलिसांकडून करण्यात आली असून हे प्रमाण केवळ ४५ टक्के आहे. तर, ४२६ वाहनांचा ठावठिकाणा लागला नसून अद्याप चोर मोकाट आहेत. या व्यतिरिक्त २०२१ वर्षातील ५०० वाहनचोरीच्या प्रकरणांची उकलही अद्याप झाली नसल्याची बाब पोलिस आयुक्तालयाकडून देण्यात आलेल्या आकडेवारीतून समोर आली आहे.

**घरफोडीच्या ५४ टक्के प्रकरणांची उकल**

मिरा-भाईंदर व वसई-विरारमध्ये घरात कुणीही नसल्याचा फायदा घेत चोर डल्ला मारत असल्याच्या अनेक घटना समोर येत आहेत. जानेवारी ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत ५३९ घरफोडीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. यात सर्वाधिक वालीव पोलिस ठाण्यातील ९९ तर विरार पोलिस ठाण्यातील ९५ गुन्ह्यांचा समावेश आहे. यातील केवळ २९२ प्रकरणांची उकल करण्यात पोलिस प्रशासनाला यश आले आहे. हे प्रमाण एकूण आकडेवारीच्या ५४ टक्के आहे. या पार्श्वभूमीवर वाहनचोरी व घरफोडीच्या प्रकरणांचा तपास पोलिस यंत्रणांनी गंभीरतेने घेण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. यासंदर्भात गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

2) सकाळ पान क्र. 5

# माजी आरोग्य मंत्री सावंत अपघातात जखमी

## काशी मिरा येथे कारला डम्परची जोरदार धडक

भाईंदर, ता. २० (बातमीदार) : राज्याचे माजी आरोग्य मंत्री डॉ. दीपक सावंत यांच्या कारला आज (ता. २०) काशी मिरा येथे डम्परने मागील बाजूने धडक दिल्याने ते जखमी झाले आहेत. डॉ. सावंत हे उपचारासाठी स्वतःहून मुंबईतील अंधेरी येथील क्रिटीकेअर रुग्णालयात दाखल झाले असून डम्परचालक इर्शाद खान याला ताब्यात घेतले. या प्रकरणी काशी मिरा पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मोखाडा तालुक्यातील सावर्डे गावात दोन कुपोषित बालिकांचा मृत्यू झाला. या संदर्भात १४ जानेवारी रोजी 'सकाळ'मध्ये वृत्त प्रसिद्ध झाले होते. त्यासंदर्भात अधिक माहिती घेण्यासाठी व बालिकांच्या कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी माजी आरोग्य मंत्री दीपक सावंत हे मोखाडा तालुक्यात जात होते. आज सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास काशी मिरा येथील सगणाई नाका येथे त्यांच्या कारला डम्परने मागच्या बाजूने धडक दिली. या अपघातात सावंत यांच्या पाठीच्या मणक्याला दुखापत झाल्याचे काशी मिरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदीप कदम यांनी सांगितले.



**भाईंदर :** डॉ. सावंत यांची अपघातग्रस्त कार.

CS CamScanner

CS CamScanner

दि. 21/01/23

3) म.टा.पु. पान क्र. 1

# रुग्णवाहिकेला टेम्पोची धडक

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर



मुंबई-अहमदाबाद महामार्गावर रुग्णवाहिकेला काशिमिरा परिसरात टेम्पोने जोरदार धडक दिल्याची घटना शुक्रवारी घडली आहे. ह्या अपघातात रुग्णवाहिकेतील रुग्णालाकोणतीही दुखापत झालेली नाही. या अपघातामुळे महामार्गावर काही काळ वाहतूककोंडी निर्माण झाली होती

मुंबई- अहमदाबाद महामार्गावरून ही रुग्णवाहिका वसई विरारहून मुंबईच्या दिशेला एका रुग्णाला रुग्णालयात दाखल करण्यासाठी घेऊन जात होती. या रुग्णवाहिकेला काशिमिरा पुलावर मागून येणाऱ्या एका टेम्पोने सकाळी ११.३० वाजताच जोरदार धडक दिली. या अपघातात रुग्णवाहिकेतील रुग्णाला कोणतीही दुखापत न झाल्याने त्याला तत्काळ दुसऱ्या रुग्णवाहिकेने मुंबईतील रुग्णालयाच्या दिशेने रवाना करण्यात आले. या अपघातात रुग्णवाहिकेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या घटनेनंतर धडक दिलेला टेम्पोचालक पळ काढण्याच्या प्रयत्नात असताना त्याला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती काशिमिरा पोलिसांकडून देण्यात आली.

4) लोकसत्ता पान क्र. 17

# नालासोपारा येथे चोरट्याला चोप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

गुन्हे वृत्त

**विरार :** नालासोपारा परिसरात एका बंगल्यात चोरी केल्यानंतर पुन्हा तेथेच चोरी करण्यासाठी आलेल्या पाच जणांपैकी दोघांना नागरिकांनी पकडले. त्यातील एक जण अल्पवयीन आहे. तर दुसऱ्यास नागरिकांनी चांगलाच चोप देत पोलिसांच्या ताब्यात दिले.

नाळा गावातील पद्मश्री भाऊसाहेब वर्तक विद्यामंदिराजवळ रानेभाट रोड येथे मुख्य रस्त्यावर गॅब्रियल कोरिया यांचा बंगला आहे. ते बोरिवली येथे राहत असल्यामुळे त्यांचा बंगला बंद आहे. चोरट्यांनी या बंगल्याची रेकी करून दोन दिवसांपूर्वी घरातील दोन गॅस सिलिंडर, इन्व्हर्टर व बॅटरी, वातानुकूलित यंत्र व मुलांच्या पिगी बॅगेतील पैसे असा ऐवज लांबवला होता. याबाबत कोरिया यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

त्यानंतर बुधवारी रात्री ८ च्या सुमारास पुन्हा पाच चोरटे बंगल्यातील इतर सामान चोरण्यासाठी रिक्षा घेऊन आले होते. तीन चोरट्यांनी बंगल्याच्या गच्चीवरील इन्व्हर्टर व बॅटरी चोरून नेण्याचा प्रयत्न केला असता नागरिकांच्या हा प्रकार लक्षात आला. त्यातील दोन चोरट्यांना पकडण्यात नागरिकांना यश आले, तर उर्वरित तीन जण पळून गेले. संतप्त नागरिकांनी एका चोरट्याला चोप दिला. दुसरा चोरटा अल्पवयीन आहे. सर्व आरोपी नालासोपाऱ्यातील टाकी रोड येथील रहिवासी आहेत. संतप्त जमावाने त्यानंतर चोरट्यांनी आणलेल्या रिक्षाचीही तोडफोड केली.

5) लोकसत्ता पान क्र. 17

# तुळिंजमधील फेरीवाल्यांवर पोलिसांची कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** नालासोपारा, तुळिंज परिसरातील फेरीवाल्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. त्याकडे पालिकेचे लक्ष वेधल्यानंतर दिखाव्यापुरती कारवाई केली जात होती. त्यामुळे पोलिसांनीच शुक्रवारी या फेरीवाल्यांवर कारवाई करत रस्ते मोकळे केले आहेत.

नालासोपारा, विरार व वसईला प्रवास करण्यासाठी प्रमुख रस्ता असलेल्या तुळिंज मार्गावर फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. त्यात रहदारीच्या वेळेत या रस्त्यावर चालण्यासही जागा मिळत नाही. पालिकेकडून नियमित कारवाई केली जात नसल्याने या रस्त्यावर फेरीवाले पुन्हा ठाण मांडत असत. यामुळे या रस्त्यावर सतत कोंडी होत असे. त्यात रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने अडकून पडत असत. अखेर तुळिंज पोलिसांनी शुक्रवारी बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करत रस्ता मोकळा केला. यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

CS CamScanner

CS CamScanner

६) लोकसत्ता पान क्र. १७

दि. २१/०१/२०२३

# वसई-विरारमध्ये बेकायदा वाहतूक

## वाहतूक नियमांचे उल्लंघन, प्रवाशांचा जीव धोक्यात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** खासगी मिनी व्हॅनमधून प्रवास करणाऱ्या महिलेची छेड काढण्यात आल्याची घटना विरार पूर्वेतील मांडवी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली होती. त्यावेळी बचावासाठी तिने मुलीसह वाहनातून उडी मारली होती. या घटनेत मुलीचा मृत्यू झाला होता. वाहनचालकाने प्रवासी वाहतुकीसाठी परवाना घेतला नसल्याचे उघड झाले होते. या घटनेनंतर खासगी वाहनांच्या प्रवासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पोलिसांनी खासगी प्रवासी वाहनांवर कारवाई केली नसल्याने शहरात शेकडो बेकायदा वाहने धावत आहेत. यामुळे प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे.

वसई-विरार परिसरात सार्वजनिक वाहतूक सेवा अपुरी पडत आहे. रिक्षाचालकांकडून बेकायदा भाडेवाढ केली जात असल्याने मिनी व्हॅनचालकांनी प्रवासी वाहतूक सुरू केली आहे. नालासोपारापाठोपाठ आता विरार आणि वसई परिसरातील महामार्ग, तसेच त्यांच्या उपमार्गांवर ही वाहने धावत आहेत. मिनी व्हॅनचालक एका वाहनात एका वेळी १० ते १२ प्रवासी घेतात. क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेतले जात असल्यामुळे अपघाताची भीती व्यक्त होत आहे.

वसई-विरार उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, प्रवासी वाहतुकीसाठी परमिट आवश्यक आहे. पण वसई-विरारमध्ये असे परमिट घेतलेली वाहने केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहेत.

सध्या वसई-विरारमध्ये ५०० हून अधिक मिनी व्हॅन बिनदिक्कत प्रवासी वाहतूक करत आहेत. त्याचबरोबर या वाहनांच्या चालकांनी आपले बेकायदा तळ, प्रवासी थांबेही तयार केले आहेत. त्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होऊन मोठी वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे परिवहन विभागाने अशा वाहनांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिक करत आहेत.

७) पुढारी पान क्र. ३

# १५८ बेवारस मृतदेहांवर पोलिसांनी नातेवाईक बनून केले अंत्यसंस्कार

## मिरा-भाईंदर पोलिसांचा असाही आदर्श

**मिरारोड : नामदेव काशिद**

मिरा-भाईंदर व वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत २०२२ या एका वर्षात १७८ अनोळखी व्यक्तींचे मृतदेह मिळून आले. यापैकी १५८ बेवारस मृतदेहांवर पोलिसांनीच नातेवाईक बनून अंत्यसंस्कार केले आहे. महापालिकेच्या स्मशानभूमीत बेवारस मृतदेहावर मोफत अंत्यविधी केला जात असला तरी मृतदेहाच्या अंत्यसंस्कारासाठी लागणाऱ्या इतर साहित्याचा खर्च पोलीस स्वतःच्या खिशातूनच करावा लागत आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अनेक अनोळखी व बेवारस मृतदेह मिळून येतात. यामध्ये समुद्र किंवा खाडीकिनारी व इतर परिसरात विविध कारणांमुळे अनोळखी व्यक्तींचा मृत्यू झाल्यास त्यांची ओळख पटवणे पोलिसांना मोठे जिकिरीचे जाते. या मृतदेहाची ओळख पटली तरी त्यांचे वारस मिळत नाहीत. अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाल्यास तो मृतदेह शवविच्छेदन व शवागारात नेण्यापासून त्याची ओळख पटवण्यापासून तो वारसांना हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पोलिसच करतात. मृत व्यक्तीचे नातेवाईक सापडावेत किंवा त्यांची ओळख पटावी यासाठी मृतदेह काही दिवस शवागारात ठेवला जातो. वारस सापडले नाही तर बेवारस म्हणून मृतदेहावर पोलिसांकडून अंत्यविधी केला जातो. २०२२ या वर्षात मिरा भाईंदर परिमंडळ १ मध्ये ५३ अनोळखी मृतदेह मिळून आले. त्यातील केवळ ८ मृतदेहांची ओळख पटली. उरलेल्या ४९ मृतदेहांवर पोलिसांनीच अंत्यसंस्कार केले आहेत. वर्षभरात वसई पोलीस परिमंडळ २ मध्ये ५५ अनोळखी मृतदेह मिळून आले. त्यापैकी ५ मृतदेहांची ओळख पटली तर ५३ मृतदेहांवर पोलिसांनी अंत्यसंस्कार केले. विरार पोलीस परिमंडळ ३ मध्ये ७० अनोळखी मृतदेह आढळले. त्यातील १२ मृतदेहांची ओळख पटली असून ५६ अनोळखी मृतदेहांवर पोलिसांनी अंत्यसंस्कार केले आहेत. पूर्वी सरकारी शववाहिनी, रुग्णवाहिकेची संख्या कमी होती. त्यामुळे खाजगी रुग्णवाहिकेचा वापर करावा लागत असे. त्याचा खर्च सुद्धा पोलिसांना करावा लागायचा. आता महापालिका व राज्य शासनाच्या रुग्णवाहिका लगेच उपलब्ध होतात त्यामुळे पोलीस त्याचाच वापर करतात.

### वारस शोधण्याचे काम जिकरीचे

अनोळखी मृतदेह सापडल्यानंतर त्याची ओळख पटवण्यापासून त्यांचे वारस शोधण्याचे काम सुद्धा मोठे जिकरीचे असते. त्यासाठी राज्य व देशपातळीवर समन्वय साधून माहिती उपलब्ध करून देणाऱ्या यंत्रणेची गरज आहे. काही प्रकरणात ज्यांच्या कुटुंबातील वा परिचयातील व्यक्ती विविध कारणांनी बेपत्ता झालेली असते त्यांच्याकडून सुद्धा पुरेसा शोध घेणे वा स्थानिक पोलिसांकडे पाठपुरावा करण्याचे प्रयत्न कमी पडतात. तर काही वेळा पोलिसांकडे बेपत्ता व्यक्तीचा सतत पाठपुरावा करून सुद्धा सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही, असे अनेकांकडून सांगितले जाते.

### प्रभावी यंत्रणा उभारणे आवश्यक

पोलिसांनी सुद्धा अनोळखी मृतदेहांची ओळख पटवण्यापासून त्यांचे वारस शोधण्याचे काम तसेच बेपत्ता व्यक्ती शोधण्याचे काम अतिशय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सरकारने व पोलिसांनी अनोळखी मृतदेह व त्याचे वारस शोधण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

CS CamScanner

CS CamScanner


दि. 21/01/2023

८) लोकमत पान क्र. 3

# शिजानने व्हॉट्सअॅप चॅट का डिलिट केले?

## तपासात असहकार्यामुळे कोर्टाने जामीन नाकारला

लोकमत न्यूज नेटवर्क



नालासोपारा : अभिनेत्री तुनीषा शर्मा आत्महत्या प्रकरणी तुरुंगात असलेला अभिनेता शिजान खान याने पोलिसांना तपासात कोणतेही सहकार्य केलेले नाही. त्याने डिलिट केलेले व्हॉट्सअॅप चॅट पाहता तो साक्षीदारांवरही प्रभाव टाकू शकतो, ही बाब लक्षात घेऊन न्यायालयाने अभिनेता शिजान खान याला फटकारले असून त्याचा जामीन पुन्हा फेटाळला आहे. शिजान खानने व्हॉट्सअॅप चॅट का डिलिट केले, याचा तपास आता महत्त्वाचा ठरणार आहे.

वसई न्यायालयाने १३ जानेवारीला दिलेल्या आदेशाची प्रत आता उपलब्ध झाली आहे. यात शिजान खानवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. कथित घटनेपूर्वी मेकअप रूममध्ये त्यांच्यात काहीतरी घडल्याचे दिसून येते, असे आदेशात म्हटले आहे. यामुळे आरोपीने तिला आत्महत्या करण्यास भाग पाडले असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ज्या अर्थी तो पोलिसांना तपासात कोणतेही सहकार्य करीत नाही, तसेच त्याने व्हॉट्सअॅप चॅट डिलिट केले आहेत. त्याला जामीन दिल्यास तो साक्षीदारांवर प्रभाव टाकू शकतो, असे कोर्टाचे म्हणणे आहे.

### अन्य मुलींची फसवणूक केली का?

- सत्र न्यायाधीश आर. डी. देशपांडे यांनी आपल्या आदेशात कोठडीतील चौकशीदरम्यान शिजानने सहकार्य केले नसल्याचे नमूद केले आहे.
- घटनेच्या दिवशी दुपारी २ ते २.४५ या वेळेत त्याचे आणि तुनीषाचे काय संभाषण झाले, याचा खुलासा झालेला नाही. त्याच्या मोबाइलमधून डिलिट केलेले मेसेज मुंबईतील फॉरेन्सिक लॅबमध्ये परत मिळवण्यासाठी पाठवण्यात आल्याची माहितीही कोर्टाला देण्यात आली आहे.
- शिजानने अशाच प्रकारे अन्य मुलींची फसवणूक केली होती का, याची चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तुनीषा शर्माने २४ डिसेंबरला अली बाबा- दास्तान एक काबूल या टीव्ही शोच्या सेटवर आत्महत्या केली होती.

९) सकाळ पान क्र.3

# रिक्षाचालकांचा बंदचा इशारा

विरार, ता. २० (बातमीदार) : मीटर रिकॅलिब्रेशन करता १६ जानेवारीपासून पन्नास रुपये प्रतिदिन व परवाना निलंबन तथा जास्तीत जास्त पाच हजार रुपयाची दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वसई क्षेत्रात शेअरप्रमाणे रिक्षा भाडे आकारले जाते. तसेच पालघर जिल्ह्यातील सर्व भाडे शहर रिक्षाप्रमाणे यापूर्वीच मंजूर करण्यात आले. तसेच २३ रुपयांप्रमाणे दरवाढ अद्यापही लागू करण्यात आलेली नाही. संपूर्ण पालघर जिल्ह्यात भाडे घेतले जाते व ते पूर्वी निश्चित केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात रिकॅलिब्रेशन करण्याची तातडीची गरज नाही. त्यामुळे हा दंड रद्द न झाल्यास २५ जानेवारीला बेमुदत बंदची हाक ऑटो रिक्षा टॅक्सी चालक मालक महासंघाने दिल्याचे अध्यक्ष विजय खेतले यांनी सांगितले.

CamScanner

CamScanner

राष्ट्रीय हिन्दी दैनिक

MHT

# मुंबई हिंदमाता टाइम्स

मुंबई, शनिवार 21 जनवरी 2023

RNI No. MAHHIN/2006/20347 | E-mail: mumbaihindmatatimesnews@gmail.com | Website : www.mumbaihindmatatimes.com



उत्तर प्रदेश के संतों ने बनाया धर्म सेंसर बोर्ड ...पेज-2

अश्लील मैसेज व वीडियो भेजने वाला गिरफ्तार ...पेज-3


| आज का पंचांग | सूर्योदय / सूर्यास्त | आज का मौसम | तापमान | शेयर बाजार | सर्राफा बजार |
|---|---|---|---|---|---|
| संवत् 2079, पौष, कृष्ण पक्ष अमावस्या | 07.15 am / 06.25 pm | गुलाबी ठंड की संभावना, प्रात: कोहरा छाया रहेगा। | अधिकतम 28°c / न्यूनतम 19°c | NSE Open 18,115.60 \| Close 18,060.65; BSE Open 60,901.16 \| Close 60,621.77 | Rs 57,100.00 Per 10 gm; Rs 72,100.00 Per Kg |

# माघी गणेश: शांतिपूर्वक गणेशोत्सव मनाने की अपील



वसई। इस बार माघी गणेश जयंती 25 जनवरी को है। माघी गणेश जयंती को देश के कई हिस्सों में भगवान गणेश के जन्मदिन के तौर पर मनाया जाता है। महाराष्ट्र और गोवा में त्योहारों पर तिल कुंड चतुर्थी या तिल कुंड चौथ के रूप में भी जाना जाता है और महाराष्ट्र में गणपति भक्तों के लिए इसका बहुत महत्व है।

**लोगों से पुलिस की अपील**

ऐसे में मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्षेत्र में माघी गणेश उत्सव को धूमधाम से मनाया जाएगा। इस बीच एमबीवीवी पुलिस ने किसी भी तरह की अप्रिय घटना को रोकने के लिए सुरक्षा के पुख्ता इंतजाम किए हैं। इसके लिए माघी गणेशोत्सव उत्सव के दौरान एमबीवीवी क्षेत्र में कानून व्यवस्था की कोई समस्या उत्पन्न ना हो इस लिए मीरा-भायंदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय क्षेत्र में 2023 में माघी गणेशोत्सव के लिए पुलिस व्यवस्था तगड़ी की गयी है और पुलिस आयुक्तालय क्षेत्र में माघी गणेश उत्सव के दरमियान 79 सार्वजनिक और निजी 1582 गणेश मूर्तियों की स्थापना की जाएगी। पुलिस अधिकारी ने एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत क्षेत्र में शांतिपूर्वक गणेशोत्सव मनाने की अपील की है।

CamScanner

लोकमत

# हुक्का पार्लरवर ससूपाड्यात कारवाई

नालासोपारा : मुंबई - अहमदाबाद महामार्गावरील ससूपाडा येथील जन्नत क्लब अँड लौंज येथे बुधवारी रात्री अमलीविरोधी पथकाने धाड मारून कारवाई केली आहे. येथे तंबाखूमिश्रित प्रतिबंधित हुक्का पुरविला जात होता. चालक व मॅनेजर मोहम्मद अश्रफ मंडल (५२), वेटर म्हणून काम करणारे अब्दुल्ला शेख (२१), विपलब जना (२५), ग्राहक उत्तमसिंग चौहान (४०), मनोज पासी (३९), गौरीमाँ नदाफ (३०), पूजा दुबे (२९) या सात जणांवर पोलिस हवालदार सुभाष आव्हाड यांनी गुरुवारी वालीव पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी या ठिकाणाहून २५ हजार ८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



CamScanner

# आता १५ दिवसांत मिळतो पासपोर्ट; वर्षभरात ७५ हजार जणांनी काढला

## कामाबरोबरच परदेशात फिरायला जाणाऱ्यांची वाढली संख्या

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : बदलत्या काळानुसार आता परदेशवारी करणे सोपे झाले आहे. देशातील कित्येक नागरिक कामासाठी तर काही सर्रासपणे फिरण्यासाठी म्हणूनही परदेशात जातात. फिरण्यासाठी जाणारे काही दिवसांचा व्हिसा घेतात व परत येतात. विदेशी प्रवासासाठी पासपोर्ट हा महत्त्वाचा दस्तावेज आहे. व्हिसा काढायचा असल्यास पासपोर्ट हा अत्यंत महत्त्वाचा आहे. पासपोर्ट नसल्यास व्हिसासुद्धा मिळत नाही.

पासपोर्ट अर्थात पारपत्र म्हणजे आपल्या देशातून परदेशात जाण्यासाठी सरकारकडून मिळालेली रीतसर परवानगी. यासाठी भारताचा परराष्ट्र व्यवहार खात्याकडे अर्ज करावा लागतो. वसईतील एव्हरशाइन येथील पासपोर्ट कार्यालयात अर्ज सादर केल्यानंतर अर्जदारांना पावती आणि मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष उपस्थित राहावे लागते. पारपत्रासाठी अर्ज जमा केल्यानंतर ७ दिवसांपर्यंत आपल्या भागातील स्थानिक पोलिस ठाण्यात चौकशीसाठी येतो.

मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या अंतर्गत २०२२ मध्ये पासपोर्टसाठी

**७४,८५७** नागरिकांनी अर्ज केले.


**७४,८५६** नागरिकांना कायदेशीर प्रक्रिया झाल्यावर पासपोर्ट देण्यात आलेले आहे.

**१** अर्ज पेंडिंग



### कागदपत्रे काय लागतात

जन्मदाखला, लिव्हिंग सर्टिफिकेट, रहिवासी दाखला, स्वत:चे ओळखपत्र पॅनकार्ड, मतदान ओळखपत्र यासारख्या कागदपत्रांची मूळ प्रत आणि झेरॉक्स प्रत आवश्यक आहे. एखादे आवश्यक कागदपत्र नसेल, त त्यासाठी आवश्यक ॲफिडेव्हिट लागते. त्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून पासपोर्ट सेवा केंद्रात जावे लागते.



### पासपोर्टसाठी दीड हजाराचा खर्च

पासपोर्टसाठी ४५ दिवस, तर तत्काळ पारपत्र ७ दिवसात मिळतो. यासाठी १५०० रुपयांपर्यंत खर्च येऊ शकतो. वय हे ६० पेक्षा जास्त असेल तर त्याकरिता १३५० रुपये इतका खर्च येतो. तत्काळ पासपोर्टकरिता २ हजार ते ४ हजार रुपये खर्च लागतो.

### डाकघरात नाही सेवा

पोलिस आयुक्तालयातील ६ शहरातील डाक घरात पासपोर्ट सेवा अद्यापपर्यंत उपलब्ध झालेली नाही. ऑनलाइन अर्ज करून पासपोर्ट कार्यालयात नागरिकांना जावे लागत असल्याने त्यांना त्रास सहन करावा लागतो.

### पासपोर्टसाठी अर्ज कसा कराल?

पासपोर्टसाठी पारपत्र विभागाच्या संकेतस्थळावर माहिती भरून, त्यावर मिळणारा आयडी घेऊन मालाड किंवा ठाणे येथील पासपोर्ट कार्यालयात जावे लागते. यानंतर कागदपत्रांची पडताळणी केली जाते.

### पडताळणी करून चौकशी केली जाते

पासपोर्टसाठी नागरिकांनी अर्ज केल्यावर त्याची कागदपत्रे सत्यता पडताळणी करून व्हेरिफिकेशन केले जाते. तसेच त्याच्यावर स्थानिक पोलिस ठाण्यात काही गुन्हे दाखल आहेत का ही चौकशी केली जाते. - कार्यालय प्रमुख, पासपोर्ट विभाग



CamScanner

दैनिक
# आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक : २७३ | शनिवार २१ जानेवारी २०२३ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने : ०४

## उत्कृष्ट कार्य; पोलीस अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र देऊन गौरव

**वसई.** मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे नवनियुक्त पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी डिसेंबर २०२२ मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व पुरस्कार देऊन गौरव केला आहे.अशी माहिती पोलीस अधिकाऱ्याने शुक्रवारी दिली. २० जानेवारी रोजी पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास बर्वे, पोलीस निरीक्षक राहुल राख, पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे (गुन्हे शाखा युनिट ०२), पोलीस निरीक्षक अविराज कुन्हाडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे आणि पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख (गुन्हे शाखा युनिट ०२) यांचा समावेश होता. शाखा युनिट ०३) त्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचे मनोबल वाढवले.



CS CamScanner

# एमबीवीवी पुलिस आयुक्तल के अधिकारी हुए सम्मानित



वसई : दिसबंर २०२२ में उत्कृष्ट काम करने वाले पुलिस अधिकारी व पुलिस कर्मचारियों को नव नियुक्त मीरा-भाईदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के पुलिस कमिश्नर मधुकर पांडेय ने प्रशस्ति-पत्र व पुरस्कार देकर उन्हें सम्मानित किया है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। २० जनवरी को पुलिस कमिश्नर मधुकर पांडे ने अपने हाथों से वरिष्ठ पुलिस निरीक्षक कैलास बर्वे, पुलिस निरीक्षक राहुल राख, पुलिस निरीक्षक शाहूराज रणवरे (क्राइम ब्रांच यूनिट ०२),पुलिस निरीक्षक अविराज कन्हाडे.वरिष्ठ पलिस निरीक्षक संजय हजारे व पलिस निरीक्षक प्रमोद बडाख (क्राइम ब्रांच यनिट ०३ ) को प्रशस्ति-पत्र देकर सम्मानित किए हैं।

CamScanner